# कागदाचा कोनमापक




1. 10 सेंटीमीटर आकाराचा एक चौरस कागद घेऊन (ABCD) त्याची मध्यावर घडी घाला.




2. त्याचे B टोक मध्य रेषेवर अशा तऱ्हेने दुमडा, की त्याची A टोकापासून घडी होईल.




3. AGB हा 60 अंशाचा असेल. 'B' हा काटकोन असल्याने 90 अंशाचा आहे, म्हणून 'A' हा कोन 30 अंशाचा असेल. आता खालच्या बाजूची GX या रेषेवर घडी घाला.




4. आता AD या बाजूची AB या बाजूवर घडी घाला. त्याने DAB या कोनाचे दोन सारखे भाग होतील.




5. या कागदी कोनमापकाने 15, 30, 45, 60, 75 आणि 90 अंशाचे कोन मोजता येतील. आता तुम्ही जर कधी कोनमापक न्यायला विसरलात, तर घडी घालून लगेच एक कोनमापक तयार करा!